# ० नियमित दिवाणी दावा क.१८/२०२० निशाणी क.१६ खालील आदेश
## (पारीत दिनांक २९.०४.२०२२)

०१. प्रस्तुतचा अर्ज हा वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ३९ नियम १ व २ तसेच कलम १५१ नुसार दाखल केलेला आहे.

०२. वादीचे थोडक्यात कथन असे की, मौजे कोठाळा बु.येथील ग्राम पंचायत हद्दीतील घर नं. १६५ क्षेत्रफळ ६४२६ चौ.फुट सहान जागा पैकी उत्तरेकडील २८०८ चौ.फुट जागा ज्याची चतु:सिमा पुर्वेस — सरकारी रस्ता, पश्चिमेस— सध्या भाउसाहेब यांचे शेत , दक्षिणेस — मुळ मालक यांची उर्वरित घर नं. १६५ मधील सहान जागा व उत्तरेस — आसाराम पुंजाराम यांची जागा या चतु:सिमेच्या मधील २८०८ चौ.फुट उत्तर भागाने ज्याची पुर्व — पश्चिम लांबी ७९ फुट व रुंदी ३९ फुट प्रतिवादी वादीचे मालकी ताब्यात हरकत किंवा अडथळा करु नये असा कायम मनाई हुकुम मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. तसेच सदरच्या अर्जान्वये वादीने तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे.

०३. वादी त्यांच्या अर्जात असे कथन करतात की, दावा मिळकतीची मुळ मालक मुक्ताराम उर्फ तुकाराम पि.भाऊराव साबळे व उत्तम निवृत्ती साबळे हे होते. दावा मिळकत वादीच्या वडीलांनी दिनांक २४.०३.१९६९ रोजी ५००/— रुपये मोबदला देऊन नोंदणीकृत खरेदीखता आधारे खरेदी केलेली आहे. सदरील मिळकतीमध्ये सहान जागा व ०४ खणी यांचा समावेश होता. वादीच्या वडीलांच्या मृत्युनंतर दावा मिळकतीवर वादींचा ताबा आहे. वादग्रस्त मिळकतीत ०४ खणी धाबा हा अस्तित्वात राहीलेला नाही.

०४. वादी पुढे असे कथन करतात की, दावा मिळकतीचा प्रतिवादींशी

काहीएक संबंध नाही. वादी हे जांबसमर्थ तांडा येथे राहत असुन प्रतिवादी हे मौजे कोठाळा या ठिकाणी राहत आहेत, सदर बाबीचा फायदा घेवुन प्रतिवादी हे राजकीय लोकांशी संगणमत करुन वादग्रस्त मिळकतीवर खोटया कागदपत्रा आधारे अंमल केला आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीचे नमुना ०८ अ उता—यावर नामांतर केल्यामुळे प्रतिवादींना मालकी व ताब्याचे कोणतेही हक्कम प्राप्त होत नाहीत. प्रतिवादी वादग्रस्त मिळकतीवर त्रयस्थ व्यक्तीला विक्री करण्याच्या दृष्टीने बेकायदेशीरपणे ताबा मिळविण्याच्या प्रयत्नात आहे. जर प्रतिवादीनी बळजबरीने दावा मिळकतीवर ताबा केल्यास वादीचे कधीही न भरुण येणारे नुकसान होऊ शकते. करिता मुळ दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी व त्यांच्या मार्फत ईतर कोणत्याही व्यक्तीने हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता स्वरुपाचा मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे.

०५. प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे निशाणी क्रमांक २० वर दाखल केले आहे. त्यांनी वादीच्या अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. वादीचा अर्ज हा चुकीचा व मोघम स्वरुपाचा असुन त्यांनी वादीच्या अर्जास तिव्र विरोध दर्शविला आहे.

०६. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादी यांनी खरी परिस्थती न्यायालयापासुन लपवुन ठेवली आहे. वादी यांचा मिळकतीशी काहीएक संबंध नाही. मौ.कोठाळा घर नं. १६५ एकुण क्षेत्रफळ ६६७५ चौ.फु. या क्षेत्रफळाचा मुळ मालक प्रतिवादीचे वडील बापुराव नामदेव साबळे हे होते. त्यांच्या मुत्युनंतर प्रतिवादीची आई गयाबाई बापुराव साबळे यांच्या नावे मिळकत करण्यात आली होती. प्रतिवादीच्या आईच्या मौ.कोठाळा बु. येथील मिळकत क्रमांक १६५ मधील मिळकतीस १६५, १६५/१, १६५/२ असे मिळकतीचे

क्रमांक देण्यात आले. त्याआधारे प्रतिवादी हे दावा मिळकतीचे मालक व ताबेदार झालेले आहेत. प्रतिवादी क्रमांक ०३ यांनी त्यांच्या हिश्शास आलेली मिळकत १६५/२ मिळकतीपैकी २२०० चौ.फुट गावातील निवृत्ती हरिभाउ साबळे यांना विक्री केलेली आहे.

०७. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीच्या कथनानुसार वादीच्या वडीलांनी दावा मिळकत ही दिनांक २४.०३.१९६९ मध्ये मोबदला रुपये ५००/— एवढया रकमेस खरेदी केली. मात्र वादीने दाखल केलेल्या खरेदी खताचा व दावा मिळकतीत दर्शविलेल्या मिळकतीचा कोणताही मेळ बसत नाही. करिता वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

०८. अर्जाचे व प्रतिवादी यांच्या म्हणण्याचे अवलोकन केले संचिकेसोबतच्या दस्ताचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद श्रवण केला. त्यानुसार खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसासह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे सकृतदर्शनी प्रकरण त्यांच्या हक्कात आहे हे सिध्द करतात काय ? | नाही |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजून झूकत असल्याचे ते सिद्ध करतात काय ? | नाही |
| ३ | तात्पुरता मनाई हुकूम आदेश मिळाला नाही तर वादींचे अपरिमित नुकसान होण्याची संभवना असल्याचे वादी सिद्ध करतात काय ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ४ | काय आदेश ? | अंतीम आदेशा प्रमाणे. |

## :: **का र ण मि मां सा** ::

**मुद्दा क्रं.१ ते ३** :—

०९. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने तथ्याची पूनरावृत्ती टाळण्यासाठी व संक्षिप्तता यावी म्हणून सर्व मुद्दे एकत्रीत चर्चेस घेण्यात येत आहे.

१०. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने तात्पुरता मनाईहुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरच्या अर्जाबाबतीत वादीच्या वतीने त्यांचे विधीज्ञ श्री.एस.एस.कुलकर्णी यांनी युक्तीवाद केला त्यांनी त्यांच्या युक्तीवादात असे कथन केले की, वादी हे दिनांक २४.०३.१९६९ रोजीच्या खरेदीखता आधारे मालक व ताबेदार झालेले आहेत. वादी हे दावा मिळकतीचे मालक व ताबेदार असल्यामुळे जर त्यांना तात्पुरत्या स्वरुपाचा मनाईहुकुम मिळाला नाही तर त्यांचे अपरिमीत स्वरुपाचे नुकसान होऊ शकते. त्यासोबत वादीच्या विधीज्ञांनी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ पणजी यांचा न्यायनिवाडा नारायण वि. आर्चिडियोसिझ संदर्भासाठी दाखल केलेला आहे. सदरील न्यायनिवाडयाचे अवलोकन केले.

११. प्रतिवादींच्या वतीने त्यांचे विधीज्ञ श्री व्ही.डी.उढाण यांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकतीवार प्रतिवादींचा मालकी व ताबा आहे. त्याबाबत प्रतिवादींनी महसुली दस्त पटलावर दाखल केले आहे.

१२. वादी यांनी सदरच्या अर्जाच्या कथनास दुजोरा देण्यासाठी नमुना ०८—अ, चा उतारा व दिनांक २४.०३.१९६९ रोजीचे खरेदीखत पटलावर दाखल केले तसेच प्रतिवादींनी मिळकत क्र. १६५ या मिळकतीचा नमुना ०८ अ, मिळकत क्रमांक १६५/२ मिळकतीचा नमुना ८—अ तसेच मिळकत क्रमांक १६५/१ या मिळकतीचा ८—अ दाखल केला आहे तसेच ग्राम पंचायत कोठाळा यांनी दिलेले प्रमाणपत्र व ग्राम पंचायत कोठाळा येथील कर भरणा केल्याबाबची पावती पटलावर दाखल केली आहे. तसेच भागवत आबासाहेब साबळे यांचे शपथपत्र पटलावर दाखल केले आहे.

१३. वादीचा सदरचा अर्ज हा तात्पुरता स्वरुपाचा मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीने दावा मिळकतीचा नमुना ०८ अ व दिनांक दिनांक २४.०३.१९६९ रोजीच्या खरेदीखतावर भिस्त ठेवली आहे. दिनांक २४.०३.१९६९ रोजीच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, तुकाराम भाउराव साबळे व उत्तम निवृत्ती साबळे यांनी मिळकत शिवा तेजु राठोड यांच्या हक्कामध्ये करुन दिल्याचे दिसुन येत आहे. सदरच्या खरेदी खताचे अवलोकन केले असता, मकान चौदीपारी ०४ खण माळवदासह विक्री केलेली आहे. परंतु सदरच्या दस्तावरुन दावा मिळकतीचा बोध होतांना दिसुन येत नाही. तसेच वादीने दाखल केलेल्या नमुना ०८ अ या उता—याचे अवलोकन केले असता, दावा मिळकत १६५, १६५/१, १६५/२ या मिळकतीवर प्रतिवादींची नावे दिसुन येत आहे.

१४. वादीच्या कथनानुसार दावा मिळकतीवर प्रतिवादी हे त्यांचा काही एक संबंध नसतांना वादग्रस्त मिळकत त्रयस्थ व्यक्तीला विक्री करण्याच्या

तयारीत आहेत. परंतु पटलावर प्रतिवादीने दाखल करण्यात आलेले दस्त जसे की, नमुना ०८ अ चा दिनांक २६.०२.२०२० रोजीचा उतारा त्यामध्ये असे दिसुन येते की, मौ.कोठाळा येथील घर क्र. १६५ या मिळकतीवर प्रतिवादी क्र. ०१ शिवाजी बापुराव साबळे, यांचे नाव मालकी रकाण्यात दिसुन येते. तसेच नमुना ०८ अ चा दिनांक २६.०२.२०२० रोजीचा उतारा त्यामध्ये असे दिसुन येते की, मौ.कोठाळा येथील घर क्र. १६५/२ या मिळकतीवर मालकाचे नाव म्हणुन प्रतिवादी क्र. ०३ पारस बापुराव साबळे यांचे नाव मालकी रकाण्यात दिसुन येते तसेच मिळकत १६५/१ वरील नमुना ८—अ याचे अवलोकन केले की, असे दिसुन येते की, सदरच्या मिळकतीवर प्रतिवादी क्र. ०२ वसंत बापुराव साबळे यांचे नाव मालकी रकाण्यात दिसुन येते. प्रतिवादीच्या कथनास ग्रामपंचायत कोठाळा यांनी दिलेले प्रमाणपत्र, कर भरणा केलेल्या पावत्या, व भागवत आबासाहेब साबळे यांच्या शपथपत्राने दुजोरा दिलेला आहे.

१५. प्रस्तुतचा दावा हा वादीने कायम मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे वादी यांनी दाखल केलेले दस्त हे स्पष्ट स्वरुपाचे नसुन सदर दस्तावरुन वादी हा मालक झाल्याचे दिसुन येत नाही. उलट प्रतिवादीने दाखल केलेले महसुली दस्त हे प्रतिवादींचा दावा मिळकतीवर मालकी व ताबा दर्शवित आहेत. वादीचे दावा मिळकत प्रतिवादी विक्री करुन त्रयस्थ हक्क निर्माण करीत आहे, सदरचे कथन देखिल मोघम स्वरुपाचे दिसुन येते. वादीच्या कथनास कोणत्याही दस्ताचे पाठबळ नाही. निश्चीतच दावा निकाली काढण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. पटलावर दाखल वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या दस्तांचे अवलोकन केले असता त्यावर प्रतीवादींचे नाव असल्याचे दिसुन येते.

१६. पटलावर दाखल खरेदीखत व ईतर दस्तांचे वैधता काय? या सर्व बाबी पुराव्याअंती सिद्ध होणार आहेत. सदरचा अर्ज हा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठीचा आहे. वादी व प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या दस्तावरुन त्यावर प्रतिवादीं यांच्या नावावर दावा मिळकत दिसुन येते. पटलावरील दस्तावरुन दावा मिळकत ही प्रतिवादीच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा अर्ज हा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज निकाली काढतांना प्रकरण प्रथमदर्शणी कोणाच्या हक्कात आहे. न्यायाचा समतोल कोणाच्या बाजुने झुकत आहे आणि अपरिमीत नुकसान कोणाचे होऊ शकते. एकुणच अभिलेखावरुन प्रकरण हे प्रतिवादीच्या बाजुने जात आहे. वादीस मनाई हकुम दिल्यास प्रतिवादीचे नुकसान होऊ शकते, त्यामुळे त्यांच्या कोणत्याही हक्कावर गदा आणने उचित ठरणार नाही. त्यामु ळे सकृदर्शनी प्रकरण प्रतिवादींच्या हक्कात असुन न्यायाचा समतोल देखील त्यांच्या हक्कात आहे. सबब, मुद्दे क्र.०१ ते ०३ चे उत्तर नाही असे नोंदवुन मुद्दा क्र.०४ बाबत पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची बाब अंतिम निकालाच्या वेळी लक्षात घेतली जाईल.

RITESH VILAS NIKAM

Digitally signed by RITESH VILAS NIKAM
Date: 2022.05.09 13:04:30 +0530

( रितेश व्ही. निकम)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
घनसावंगी.

दिनांक.२९.०४.२०२२